सातारा, गुरुवार, ३ जानेवारी २०१९

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

## संशोधन महोत्सवात 'डी. पी. भोसले'चे यश

कोरेगाव : शिवाजी विद्यापीठाच्या आविष्कार संशोधन महोत्सवांतर्गत सातारा येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत सहापैकी पाच विभागांमध्ये येथील डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. मानव्यशास्त्र विभागात सिमरन इनामदार आणि शेती व पशुसंवर्धन विभागात शुभम लवळे यांनी प्रथम क्रमांक पटकावले. अभियांत्रिकी, तंत्रज्ञान विभागात अभिजित बर्गे आणि वैद्यक, औषधशास्त्र विभागात शाहीन इनामदार यांनी द्वितीय क्रमांक, तसेच मूलभूत विज्ञान विभागात स्नेहल घाडगे हिने तृतीय क्रमांक मिळवला. या सर्वांना डॉ. बी. एस. लोकडे, डॉ. एन. डी. निकम, डॉ. एस. डी. जाधव, डॉ. व्ही. एस. जमदाडे यांचे मार्गदर्शन लाभले.